**<u>ठळक बातम्या</u>**

- परकीय शक्तींच्या पाठिंब्याने घटनात्मक संस्था कमकुवत करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा केंद्रीय मंत्र्यांचा आरोप

- मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलकांची दिल्लीत धरपकड

- संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत बहुराष्ट्रीय 'तरंग शक्ती' सरावाला प्रारंभ

**आणि**

- रशियाकडून डिझेलच्या आयातीवरचे निर्बंध अमेरिकेने शिथिल केले

**<><><><><>**

परकीय शक्तींच्या पाठिंब्याने घटनात्मक संस्था कमकुवत करण्याचा आणि नागरिकांचा लोकशाहीवरचा विश्वास तोडण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला आहे. दिल्लीत विरोधी पक्ष आणि इतर संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनासंदर्भात ते वार्ताहरांशी बोलत होते. देशात अस्थिरता निर्माण करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याची टीका भाजपाचे अध्यक्ष नितिन नबीन यांनी केली. भारताची लोकशाही ही अतिशय बळकट असून हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी देशवासी एकत्र येतील, अशा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतरमंतरवरच्या आंदोलन करण्यासाठी निघालेल्या अनेक आंदोलक आणि राजकीय नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं. कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका यांना विमानातूनच ताब्यात घेतलं. तसंच

यूट्यूबर ध्रुव राठीला त्याच्या घरातून ताब्यात घेण्यात आलं. सुरक्षेच्या कारणास्तव आणि प्रशासनिक कारणांसाठी पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारली होती.

स्टूडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेच्या ४०० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांनाही तसंच काही आंदोलक वकिलांनाही ताब्यात घेण्यात आलं आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी हस्तक्षेप करून ताब्यात घेतलेल्या वकिलांना सोडून द्यायच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत.

जंतरमंतरच्या बाहेर प्रचंड मोठा पोलीस बंदोबस्त आहे. संपूर्ण दिल्लीत पोलीस आणि निमलष्करी दलांचे जवळपास २५ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ४५ मेट्रो स्थानकांमध्ये प्रवेश करण्यावर आणि बाहेर पडण्यावर निर्बंध लावले आहेत. दिल्लीच्या सीमा, रेल्वेस्थानकं, बस स्थानकांसह इतर संवेदनशील ठिकाणांवर टेहळणी वाढवण्यात आली आहे. जंतरमंतरच्या ४ किलोमीटर परिसरात इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद आहेत. तसंच दिल्लीला जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, दिल्लीत आकाशवाणी भवनाजवळ पोलिसांवर झालेल्या दगडफेकीत २ पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. इथूनही अनेकांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

दिल्लीतल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानातही आज आंदोलन होत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांच्यासह इतरांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं. सामाजिक कार्यकर्ते फिरोज मिठिबोरवाला यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं. ऑगस्ट क्रांती मैदान ही आंदोलनांची जागा नाही आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

इंडिया आघाडीच्या नेत्यांनी काल रात्री राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा मागण्याच्या त्यांच्या अधिकाराचा त्यांनी वापर करावा, अशी विनंती केली. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया रद्द करावी, गेल्या २ वर्षांत झालेल्या विविध राज्यांच्या विधिमंडळांच्या सर्व निवडणुका रद्द कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. तसंच, मुख्य निवडणूक आयुक्तांसह इतर निवडणूक आयुक्तांना कायद्यापासून आजीवन संरक्षण देणारा २०२३चा कायदा रद्द करावा, आणि निवडणुका पुन्हा मतपत्रिकांवर घ्याव्यात, या मागण्यांचं निवेदनही इंडिया आघाडीच्या नेत्यांनी राष्ट्रपतींना दिलं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम. ए. बेबी, कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस डी. राजा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्यासह इतर विरोधी पक्षांचे नेते यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

आंदेलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतल्या मेट्रो आणि रेल्वेची वाहतूक पूर्णपणे बंद करू नये असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप करणारी याचिका आज दाखल करण्यात आली.

आज दुपारी २ पर्यंत दिल्लीत पोहोचणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या जातील तसंच ५७ मेट्रो स्थानकंही बंद राहतील असं रेल्वे प्रशासन आणि दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशननं जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा

प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहेत संविधानाचं कलम ३७० रद्द करण्याच्या निर्णयाबाबत.

**व्हॉईस कास्ट (१ मिनिट ४० सेकंद)**

*(स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानांचं भारतीय संघराज्यात विलिनीकरण ही एक मोठी मोहीम होती. ब्रिटीश सरकारने भारताला स्वातंत्र्य बहाल करताना फाळणीला मान्यता दिली आणि स्वायत्त संस्थानांना स्वतःचा निर्णय घ्यायला सांगितलं. भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नांनी ही बहुसंख्य संस्थानं भारतीय संघराज्यात आपखुशीनं विलीन झाली. जम्मू आणि काश्मीरच्या बाबतीत मात्र वेगवेगळ्या घडामोडी झाल्यामुळे संविधानाच्या कलम ३७० अन्वये काश्मीरला वेगळं स्थान देऊन भारतीय संघराज्याबरोबर जोडण्यात आलं. त्यातल्या तरतुदींमुळे या प्रांतातले विविध कायदे आणि नियम भारतीय संघराज्यापेक्षा वेगळे होते. ५ ऑगस्ट २०१९ रोजी हे कलम रद्द करण्यात आलं. त्याचवेळी जम्मू काश्मीर हा एक आणि लदाख हा दुसरा केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला. दहशवादाच्या प्रभावाखाली दबलेलं काश्मीरचं जनजीवन सुरक्षित वातावरणात नेण्याच्या तसंच तिथं सर्वसमावेशक विकासाला चालना देण्याच्या उद्देशानं हे पाऊन उचलण्यात आलं. या कायद्याला नंतर न्यायालयात आव्हान देण्यात आलं, मात्र ११ डिसेंबर २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाच्या बाजूने कौल देत जम्मू काश्मीर पुनर्रचना कायदा वैध ठरवला. या कायद्यामुळे आता उर्वरित देशातले कायदे विना अडचण काश्मीरमधेही लागू होतात. तिथल्या नागरिकांनाही इतर भारतीयांप्रमाणे हक्क आणि अधिकार मिळतात. तिथल्या नायब राज्यपालांना विशेष स्थान देणारं कलम ३५ अ देखील रद्दबातल झालं. या सर्व बाबींमुळे जम्मू - काश्मीरमधे शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा विकास, गुंतवणूक आणि पर्यटनाला चालना मिळाली आहे. )*

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज राजस्थानमधील जोधपूर हवाई दल तळावर आयोजित 'तरंग शक्ती' या बहुराष्ट्रीय हवाई सरावातील महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहिले.

जग आधुनिक युद्धपद्धतीतल्या मुलभूत परिवर्तनाला सामोरं जात आहे. कृत्रिम तंत्रज्ञानामुळं निर्णयक्षमतेला वेगळा आयाम मिळतो आहे, असं ते यावेळी म्हणाले.

या भेटीदरम्यान, संरक्षण मंत्र्यांनी भारतीय हवाई दल आणि सरावात सहभागी झालेल्या परदेशी हवाई दलांच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

**--- होल्ड राजनाथ सिंह ---**

राजनाथ सिंह यांनी आधुनिक लढाऊ विमानांची प्रभावी हवाई प्रात्यक्षिकं पाहिली आणि स्वदेशी तसंच परदेशी लढाऊ विमानांचं प्रदर्शनही पाहिलं. २६ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या सरावाचा उद्देश सहभागी हवाई दलांमधील कार्यात्मक सहकार्य, परस्पर कार्यक्षमता आणि परस्पर सामंजस्य बळकट करणं हा आहे.

**<><><><><>**

संयुक्त अरब अमिराती मधल्या शारजाह बंदरात इथं काल झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर पनामाचा ध्वज असलेल्या कच्च्या तेलाच्या टँकरवर कार्यरत असलेले सर्व २२ भारतीय खलाशी सुरक्षित असल्या केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं आहे. संबंधित अधिकारी जहाज व्यवस्थापन कंपनीच्या संपर्कात आहेत, असं सोनोवाल यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन षण्मुगरत्नम आणि प्रधानमंत्री लॉरेन्स वोन्ग यांच्याबरोबर आज द्विपक्षीय चर्चा केली. भारत आणि सिंगापूर यांच्यातली समावेशक सामरिक भागीदारी पुढे नेण्यावर आणि द्विपक्षीय संबंध दृढ करण्यावर या बैठकीत चर्चा झाल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्यात झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने रशियाकडून खरेदी केलेल्या

डिझेलच्या विक्री आणि आयातीवरील निर्बंध ७ एप्रिल २०२७ पर्यंत शिथिल केले आहेत. युक्रेनने रशियाच्या इंधन शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले चढवल्यामुळे डिझेलच्या उत्पादनावर परिणाम झाल्याने मॉस्कोला डिझेलच्या निर्यातीवर निर्बंध लादावे लागले होते. त्यानंतर इराणचं समर्थन असलेल्या येमेनच्या सशस्त्र दलांनी सौदी अरेबियावर केलेल्या हल्ल्यांमुळे इंधन पुरवठ्यावर आणखी मर्यादा आल्या होत्या. मात्र, रशियाने येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर डिझेलचा पुरवठा करायला मान्यता दिल्याबद्दल ट्रम्प यांनी रशियाच्या अध्यक्षांचे आभार मानले आहेत. दरम्यान, अमेरिकेला तसंच जागतिक बाजाराला रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम दिसून येतील असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी म्हटलं आहे. तर, कोणत्याही कायमस्वरूपी कराराशिवाय निर्बंध शिथिल केल्यास रशियाला युद्ध लांबवण्याची संधी मिळेल असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना इंदोर इथं उद्या संध्याकाळी सात वाजता होणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतल्या आतापर्यंत झालेल्या दोन सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिजनं प्रत्येकी एक विजय मिळवत बरोबरी साधली आहे. भारतानं पहिला सामना जिंकल्यावर काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं विजयासाठी दिलेल्या २५० धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करत वेस्ट इंडिजनं हा सामना जिंकला. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप यानं ४५ चेंडूत १०२ धावा करत वेस्ट इंडिजच्या विजयात महत्वपूर्ण योगदान दिलं.

**//<><><><><>//**